
बा. वा.
२८९२
१।८।९३

ऑपरेशन ब्लॅक बोर्ड योजनेखालील पुस्तक – १९९२-९३




मुलांसाठी मनोरंजक गोष्टी

# मधाची चोरी!

BVBK-0402812

लेखक
प्रभाकर गाताडे

शकुन प्रकाशन, पुणे



प्रकाशक :
सौ. रेखा हर्डीकर
शकुन प्रकाशन
१०५, नारायण पेठ
आनंद अपार्टमेंट
पुणे ४११०३०

© शकुन प्रकाशन

किंमत ८ रु.

मुखपृष्ठ सजावट
रमेश मुधोळकर

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

# १. मधाची चोरी

एकदा काय झाले.

मधमाश्यांच्या पोळ्यातला मधच चोरीला गेला. मधमाशा कामाला बाहेर गेल्या होत्या, त्या परत आल्या तेव्हा त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली.

"हाय! हाय! आम्ही बुडलो. ठार बुडालो." त्या आक्रोश करू लागल्या.

त्यांची रडारड ऐकून सारे पशु-पक्षी गोळा झाले.

"काय हो, काय झालं?" हत्तीने विचारले.

मधमाश्यांनी शोक करतकरतच सारी हकीकत सांगितली.

"फार माल नाही ना गेला?" हरणाने विचारले.

"आम्ही साफ बुडालो." माशी वैतागाने म्हणाली.

"जन्मभर खपून थेंब थेंब करून साठवलेले आमचे सारसर्वस्व चोराने लुटून नेले की हो!"

"काही वाईट झालं नाही." फूलपाखरू हिणवत म्हणाले, "नाही तरी

तुम्ही तो फुलाफुलांतून लुटूनच आणला होता ना?"

"आम्ही आपल्या भविष्याची तरतूद करून ठेवतो तर फुलपाखरू स्वच्छंदपणे बागडते. त्याला मागचा-पुढचा विचार नाही." मधमाशा फुलपाखरांची अशी चेष्टा नेहमी करीत असे त्याचे उट्टे त्याने फेडले.

फुलपाखराचा हा विघ्नसंतोषीपणा कुणालाच आवडला नाही. त्याच्या बरळण्याकडे दुर्लक्ष करून मध कुणी चोरून नेला असावा याचा विचार सारेजण करू लागले.

"हे काम नीच माणसाचे असावे." वाघ म्हणाला. माणसाने गोळी घालून त्याची शिकार करायचा प्रयत्न केला होता त्याचा बदला त्याने घेतला.

"ही करणी माणसाची दिसत नाही." कोल्हा म्हणाला.



"ते कसं काय?" वाघ खेकसला.

"माणसं पोळी काढून नेतात. इथं ते शाबूत आहे." कोल्ह्याने शांतपणे

खुलास केला.

"मला वाटतं, हे काम मुंग्यांचं असावं." हत्ती कान झाडत म्हणाला. मुंगीने एकदा कानात शिरून त्याला फार छळले होते, त्याचा वचपा काढायला ही संधी बरी आहे असे त्याला वाटले.

"हे मात्र शक्य आहे" कोल्हा म्हणाला. "आसपास कुठे वारूळ आहे का मुंग्यांचं?"

"नाही बाई." मधमाशी म्हणाली, "तशी सुरक्षित जागा पाहूनच आम्ही पोळं बांधलंय इथं."

"कदाचित भुंग्यांचं काम असावं हे !" फुलपाखरू मध्येच तोंड खुपसून म्हणाले.

"मग तुझंच काम असावं असं का म्हणू नये?" कोल्हा बिनतोड प्रश्न करत म्हणाला. "तुलाही फुलां-फुलांतला मध खाण्याची खोड आहेच त्याच्यासारखी."

"म-म-म-मी नाही." फुलपाखरू थरथरत म्हणाले.

"मला हों लागून लागून किती मध लागायचा?"

"मग भुंग्याला तरी कितीसा लागणार?" कोल्हा म्हणाला. काही झाले तरी एवढे थबथबलेले पोळे एवढ्या वेळात खाली करणे दोघांनाही शक्य नाही हे सर्वांच्या लक्षात आले.

सर्वजण डोके खाजवू लागले.

"थांबा" कोल्हा एकदम म्हणाला. सर्वजण त्याच्याकडे उत्सुकतेने पाहू लागले.

"कुणीतरी कुत्रोजीरावांना बोलावून आणा पाहू." कोल्ह्याने सांगितले. येथे कुत्र्याचे काय काम आहे ते कुणाला कळेना. पण कोल्ह्याच्या बुद्धीविषयी आदर असल्याने कुणी जास्त चौकशी करण्याच्या भरीस पडले नाही. एका मधमाशीनेच उडत जाऊन कुत्रोजीरावांना निरोप सांगितला. जातभाईच्या निमंत्रणाचा मान ठेवून कुत्रोजीराव तातडीने येऊन दाखल झाले.

"या कुत्रोजीराव" कोल्ह्याने त्यांचे स्वागत केले. त्याने मधाची चोरी झाल्याची हकीकत त्यांना सांगितली आणि तो म्हणाला,

"माणसांच्या घरी चोऱ्या झाल्या त्या तुम्ही चातुर्याने हुडकून दिल्या असा तुमचा लौकिक जंगलात आला आहे. तुम्ही तशीच हिकमत लढवून बिचाऱ्या मधमाश्यांची चोरी पकडून द्यावी अशी सर्वांतर्फे मी तुम्हाला विनंती करतो."

"विनंती कशाला? हुकूम म्हणा." कुत्रोजीराव विनयाने म्हणाले, "तुम्ही माझे बांधव आहात."

कुत्रोजीराव पोळयाजवळ गेले आणि त्यांनी त्याचा एकदा नीट वास घेतला.

सवंजण कौतुकाने पाहत उभे राहिले. कुत्रोजीराव मग पशु-पक्ष्यांच्या रोखाने आले आणि फुलपाखराजवळ थांबले आणि त्यांनी त्याच्याकडे संशयाने पाहिले.

"म-म-मी नाही." फुलपाखरू कसेबसे म्हणाले. पण कुत्रोजीरावांचे त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. ते तसेच जमीन हुंगत पुढे निघाले. सर्व पशु-पक्षीही त्यांच्या मागोमाग निघाले.

जाता-जाता कुत्रोजीराव एका गुहेजवळ थबकले. त्यांनी नीट वास घेतला आणि दुसऱ्याच क्षणी ते 'भोऽभो' करीत सरळ गुहेत शिरले.



गुहेतून आधी 'अरे, हड्ऽहड्' आणि मग 'मेलोऽमेलो' असा आवाज ऐकू आला आणि त्यापाठोपाठ पुढे अस्वल आणि मागे कुत्रोजीराव

असे शिवशीव करत बाहेर आले.

गुहेसमोर रानातले सर्व पशु-पक्षी पाहून अस्वल चमकून थबकले.

"हाच तुमचा मध-चोर आहे." कुत्रोजीराव म्हणाले.

"खोटारडा कुठला!" अस्वल उसन्या अवसानाने म्हणाले.

"तोंडाला मध लागला असताना तरी असं बोलू नकोस." कुत्रोजीराव म्हणाले.

"कुठंय? कुठंय?" अस्वल तोंड पुसत म्हणाले.

"आणि आत गुहेत मधाचा शिसा भरून पडलाय शिवाय पोळ्यापासून इथं गुहेपर्यंत मधाचा वास जमिनीवर भरून राहिलाय नुसता." कुत्रोजीराव चोरीचे माप त्याच्या पदरात घालत म्हणाले.

अस्वल खजिल झाले.

"चोर कुठला? धरा त्याला." मधमाशा खवळून अस्वलावर धावल्या आणि अस्वल मेलोऽमेलो करत पळत सुटले.

* * *

म. सं. मं. कर्वे, ग्रंथालय शाखा.
विभाग.
ग्रं. क्र. २८९२ दिनांक ९।११।९३
विषय ११:११ क्र.

# २. माशांचा राजा

एका मोठ्या माशाला पकडण्यासाठी कोळयाने नेम धरून मारलेला गळाचा बाण बरोबर त्याच्या डोक्यात घुसला आणि तेथे रुतून बसला. बाण बरोबर निशाणीवर लागलेला पाहाताच कोळयाने त्याला मागे लावलेला दोर भराभर आत ओढून घ्यायला सुरुवात केली. तो मासा त्याच्या हातात सापडायचाच, पण खूप हिसकाहिसक करून त्याने तो दोरच तोडून टाकण्यात यश मिळवले आणि तो जिवानिशी निसटून खोल पाण्यात गेला.

अशा तऱ्हेने त्याने आपली सुटका करून घेतली खरी, पण डोक्यात रुतलेला बाण काही त्याला काढता येईना. जो जो तो त्याच्यासाठी धडपड करी तो तो बाण अधिकच आत फसत जाई व त्याला प्राणांतिक वेदना होत. तेव्हा त्याने अखेरीला तो नाद सोडून दिला आणि तो बाणाचा सल तसाच शिरी वाहू लागला. कालांतराने बाणाच्या मागची दोरी कुजून निघून गेली, पण डोक्यावर गेंड्याच्या शिंगासारखा दिसणारा तो बाण तसाच राहिला.

त्या बाणाच्या चरत जाणाऱ्या जखमेमुळे माशाला त्रास होऊ लागला. त्याला पहिल्यासारखी मुक्तपणे हालचाल करता येईना. त्याचे मुख्य भक्ष्य म्हणजे लहान-लहान मासे होते, त्याच्या हालचालीत सुस्तपणा आल्याने त्याला आपले ते भक्ष्य नीट पकडता येईना. कारण ते चपळाई करून त्याच्या हातून निसटून जाऊ लागले. त्यामुळे त्याची उपासमार होऊ लागली. शिवाय पाण्यातून वाहत येणारे लाकडाचे ओंडके इत्यादी



जड पदार्थांचा धक्का पोहताना डोक्यावरचा बाणाला लागला तर जीवघेण्या वेदना होत त्या निराळ्याच.

तेव्हा आता आपल्याला विशेष हालचाल न करता जागच्या जागी भक्ष्य कसे मिळेल याचा विचार तो करू लागला. तो राहत होता त्या उत्तर समुद्रात सारेजण त्याला आणि त्याच्या झालेल्या अपघातामुळे त्याच्या डोक्यात असलेल्या बाणाला ओळखत होते. त्यामुळे त्याने दुसऱ्या समुद्रात जायचे ठरवले आणि तो दक्षिण समुद्रात आला.

दक्षिण समुद्रातले मासे त्याचे विचित्र रूप पाहून बावरून गेले आणि त्याच्यापासून दूर-दूर राहू लागले. मोठा मासा त्यांना ढोंगी आवाजात म्हणाला, "बाळांनो, घाबरू नका. माझ्याजवळ या. मी तुमच्यासारखा मासा आहे."

पण माशांना थोडेसे हायसे वाटले तरी त्यांना विश्वास वाटेना.


"पृथ्वीवरची इतर जीवसृष्टी पाण्यात बुडून नष्ट झाली, त्याप्रमाणेच इथली जलचरे पाण्याच्या अभावी नष्ट होणार."

"वाचवा, आम्हांला वाचवा," माशांनी एकच गिल्ला केला.

"पण सर्वांना वाचवणे कसे शक्य आहे." मोठा मासा छद्मीपणाने म्हणाला. "जे मनूला जमलं नाही ते आपल्याला कसं जमणार? मी फारतर काही निवडक जातींना वाचवू शकेन."

"असं करू नका. आम्हांला साऱ्यांना वाचवा." "बाकीचे मरू द्यात. मला वाचवा. मी महत्वाचा मासा आहे." "माझ्या मुला-माणसांना वाचवा." असे निरनिराळे मासे विनवू लागले.

"शांत व्हा." मोठा मासा ढोंगीपणाने म्हणाला. "तुमचा आग्रह मला मोडवत नाही. कारण तुम्ही माझे जातभाई आहात. मी तुम्हा सर्वांना वाचविण्याचा प्रयत्न करीन. मग या कामात मला कितीही कष्ट पडले तरी हरकत नाही."



"मत्स्यराजांचा जयजयकार असो." सर्व मासे एका सुरांत ओरडले. "तुम्ही आजपासून आमचे राजे आहात. तुम्ही म्हणाल तसं आम्ही वागू. पण कसंही करून आम्हाला वाचवा."

"तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवून मी म्हणतो तसं वागावं लागेलच. तुमच्या सहकार्याशिवाय तुम्हा साऱ्यांना वाचविण्याचं काम

पार पडणं अशक्यच आहे." मोठा मासा दांभिकपणे म्हणाला.

"आम्ही काय करायचं ते सांगा." मासे ओरडले.

"उद्यापासून तुमच्यापैकी काही माशांनी माझ्याबरोबर यायचं. मी त्यांना भरपूर पाण्याच्या, कधीही कोरडा पडण्याचं भय नसणाऱ्या समुद्रात घेऊन जाईन. त्यांना पोहोचविलं की दुसऱ्या समूहाला नेण्यासाठी परत येईन. आहे कबूल?"

"कबूल! कबूल!!" मासे हर्षभराने ओरडले. मोठ्या माशाचे मोठमोठे डोळे चमकले. हे मासे त्याला वाटले त्याच्याहून जास्त मूर्ख निघाले होते. दुसऱ्या दिवसापासून त्याने थोडे थोडे मासे उत्तर समुद्राकडे घेऊन जाण्यास आरंभ केला. थोडे दूर जाताच आजूबाजूला कोणी दुसरे मासे नाहीत असे पाहून तो त्यांना गट्टम करून टाकी आणि दुसऱ्या समूहांना नेण्यासाठी परत येई. आता त्याला कशाची ददात पडणार नव्हती. दक्षिण समुद्रातले मासे संपले तर तो त्याला जेथे कुणी ओळखत नव्हते, अशा दुसऱ्या समुद्रात जाऊ शकणार होता आणि तिथल्या माशांना 'वाचविण्याचे' काम पुढे चालविणार होता.

* * *

# ३. नकलाकार पोपट


एक होते पोपटाचे पिल्लू. पाचूसारखे हिरवेगार अंग. फुटलेल्या डाळिंबासारखी लालभडक चोच. चोचही कशी बाकदार! मानही कशी ऐटदार आणि छातीही कशी भरदार! त्याच्या आईला तर आपल्या या गोजिरवाण्या बाळाला कुठे ठेवू आणि कुठे नको असे होई. तो झाडाच्या फांदीवर झोकात बसला किंवा आभाळात डौलदारपणे भरारी मारू लागला की त्याची आई पाहतच राही.

पण आपल्या या गोमट्या बाळाबद्दल तिला वेगळीच काळजी लागून राहिली होती. साऱ्याच पोपटांना दुसऱ्या प्राण्यांच्या आवाजाची थोडीफार नक्कल करता येते. माणसाच्या आवाजाचीही ते हुबेहूब नक्कल करू शकतात हे आपण घरच्या पोपटावरून पाहतोच. पण म्हणून कुणी पोपट उठल्यासुटल्या दुसऱ्याची नक्कल करत राहत नाही. परंतु पोपटाच्या पिल्लाला ती खोड होती. आपल्याला दुसऱ्याच्या आवाजाची नक्कल करता येते हे त्याला प्रथम समजले, तेव्हा त्याला मोठी गंमत वाटली. त्याने आपली ही देणगी निरनिराळ्या प्रकारे

वापरून पाहिली. आरंभा-आरंभाला आईला त्याच्या ह्या कृतीचे कौतुक वाटले. पण पुढे उठल्यासुटल्या तो तेच करू लागला, तेव्हा तिला त्याची चिंता वाटू लागली. 'कुहूssकुssहू' झाडावर कोकिळा आपल्या पिल्लाला साद घाली.

'कुssहू'

पोपटाचे पिल्लू तिच्या पिल्लाच्या आवाजाची बरोबर नक्कल करत तिला उत्तर देई. ती बिचारी त्याला पुन्हा जवळ येण्याकरता



बोलावी. पण पोपटाचे पिल्लू नुसतेच हाकेला 'ओ' देत राही. शेवटी कोकिळा पिल्लू ओ देते आहे, पण येत का नाही हे पाहण्याकरिता येई तेव्हा तिला आपली फसगत झाल्याचे आढळून येई. पोपटाचे पिल्लू माणसाच्या हसण्याची नक्कल करीत खदखदा हसे. आधीचीच काळी कोकिळा रागाने आणखी काळी ठिक्कर पडे आणि पंख आपटत पोपटीणबाईकडे तक्रार घेऊन जाई.

केवळ कोकिळेलाच नव्हे, तर चक्रवाक पक्ष्यालाही पोपटाचे पिल्लू फसवे. चक्रवाक आपल्या बायकोला बोलावी.

"अग जरा इकडे ये पाहू."

"आले! आले," पिल्लू चक्रवाकीणबाईच्या आवाजात म्हणे. चक्रवाक बिचारा बायको आता येईल, मग येईल म्हणून वाट पाहत राही. पण ती कसची येते. कारण ती त्या वेळी दूर कुठेतरी रानात असे. तिच्या कानावरही चक्रवाकाची हाक गेलेली नसे. पण चक्रवाकाला हे ठाऊक नसायचे.

तो रागावून पुन्हा हाका मारी.

"अग येतेस ना इकडे?"

"आले! आले," पोपटाचे पिल्लू पुन्हा नक्कल करी.

आणि मग हा क्रम बराच वेळ चाले. रानातले पक्षी म्हणत, 'ही काय गंमत आहे.' आणि हसून पुढे जात. चक्रवाक त्यांच्या उपहासाने ओशाळून रागारागात बायकोचा आवाज येई तेथे येत असे, पण पाहतो तो काय? ही सारी करामत पोपटाच्या पिल्लाची आहे.

"मोठ्या माणसाची अशी चेष्टा करतोस? थांब, पाहतोच तुला." तो रागाने त्याच्या अंगावर धावून जाई. पिल्लू 'मेले मेले' असे चक्रवाकीणबाईच्या सुरात ओरडत तेथून पळून जाई. चक्रवाकाला वाटे, या पिल्लाला 'खाऊ का गिळू'. मग तोही त्याच्या आईकडे तक्रार घेऊन जात असे.

पिल्लाची आई बिचारी या तक्रारी ऐकून कावून जाई. शेजाऱ्यापाजाऱ्यांची समजूत काढता काढता तिच्या नाकी नऊ येत.

"पोरा, असं वागून कसं होणार तुझं?" ती चिंतित होऊन म्हणे. पिल्लू तेवढ्यापुरते तिला 'पुन्हा कध्धी कध्धी असं करणार नाही' असे म्हणे खरे, पण त्याला तो मोह आवरत नसे आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या सुरू होई. त्याच्या या गुणांमुळे रानातले पक्षी त्याच्यापासून फटकून राहात. त्यामुळे त्याला एकटे एकटेच उडावे लागे व तो हिरमुसला होई.

एकदा तो असाच हिरमुष्टी होऊन एका झाडाच्या फांदीवर एकटाच बसला होता. करमणुकीसाठी तो निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज काढत होता.

"अरे व्वा! काय गुणी पाखरू आहे" कुणीतरी म्हणाले. पोपटाने आवाज कुठून आला ते पाहिले तेव्हा झाडाखाली काही माणसे उभी असलेली त्याला दिसली. त्याच्या या गुणाबद्दल रानात त्याला



साऱ्यांकडून बोलणीच खावी लागत; त्यामुळे त्याची तारीफ कुणीतरी करते आहे हे पाहून त्याला बरे वाटले. त्या आनंदाच्या भरात त्याने त्या माणसांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल केली. त्याच्या त्या करणीने तर ती माणसे फारच प्रभावित झाली.

"हे घे बक्षीस!" असे म्हणून त्यांनी त्याच्यापुढे पिकलेले पेरूच पेरू आणि फोडलेली लालभडक डाळिंबे धरली. आपल्या गुणाची नुसती तारीफ होते असेच नव्हे, तर त्याबद्दल आपल्याला बक्षीसही मिळते हे पाहून पोपटाला फार अभिमान वाटला. त्याचे त्या माणसाबद्दल फार चांगले मत झाले.

तो त्यांच्याकडे झेपावला आणि त्याने पेरू आणि डाळिंबाचा समाचार घ्यायला सुरुवात केली. मधून-मधून तो आपली कृतज्ञता दाखविण्यासाठी त्या माणसांना वेगवेगळे आवाज काढून दाखवू

लागला. माणसांच्या चेहऱ्यावरून त्यांना त्याचे हे करणे फारच पसंत पडल्याचे उघड दिसत होते.

भरपूर खाणे झाल्यावर त्याने परत जाण्यासाठी पंख पसरले. पण आपण कोंडले गेलो आहोत ही कटू जाणीव त्याला तेव्हा झाली. आपण फसलो हे त्याला समजले. पण त्याला फार उशीर झाला होता. त्याने सुटण्यासाठी खूप पंख फडकवले, पण त्याचा उपयोग झाला नाही. काहीच उपयोग झाला नाही.

* * *

# ४. सशाची शिंगे


फार-फार दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. मोराचे छान छान पाय साळुंकीने नेले नव्हते, हत्तीच्या नाकाची सोंड झाली नव्हती, त्या वेळची गोष्ट!

त्या वेळीही ससा आता आहे तसाच होता. मऊमऊ, गुबगुबीत आणि चपळ. त्याचे गोजिरवाणे रूप चंद्रदेवाला फार आवडायचे. ते त्याला छातीशी धरून तासन्‌तास गोंजारावयाचे.

एकदा ससा तळ्यावर गेला. तेथे त्याला सांबर दिसले. ते पाण्यात आपले प्रतिबिंब पाहण्यात इतके दंग होते की सशाच्या येण्याची त्याला चाहूलच लागली नाही. सांबराची गंमत करण्याकरता सशाने खडा टाकून पाणी ढवळले. सांबराने चिडून वर पाहिले. ससा मिश्यांत हसत होता.

आपल्याला शिंगं नाहीत म्हणून दुसऱ्याचीही चांगली बघवत नाहीत काय?" ते डाफरले.

"आपल्याला शिंगं नाहीत अशी उणीव सशाला कधी भासली नव्हती. पण सांबराच्या या हिणवण्याने तो बेचैन झाला."



त्या बेचैनीत तो चालला असताना आपल्या मागे लागलेल्या त्या शिकारी कुत्र्याकडे त्याचे लक्ष गेले नाही. कुत्रा अगदी जवळ आला. तेव्हा कुठे सशाला आपल्यावर आलेल्या संकटाची जाणीव झाली. तो कसाबसा जीव घेऊन धावला आणि बिळात शिरला.

चंद्रदेव त्याच्याकडे आले, तेव्हाही आपल्याला शिंगे नसल्याची त्याची रुखरुख कायम होती. चंद्रदेवालाही ते जाणवले.

"आज माझ्या लाडक्याला काय झालयं?" त्यांनी हळुवारपणे विचारले.

"कसले आम्ही लाडके?" ससा फुरंगटून म्हणाला.

"आम्हाला कुठं आहेत सांबरासारखी छान-छान शिंगं? कुणीही आम्हाला हिणवावं?"

"अरे, पण..." चंद्रदेवांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

"उगीच काही तरी सांगून माझी समजूत काढू नका." ससा घुश्शात

म्हणाला, "तुमच्या मनात मला शिंगं द्यायची नाहीत. दुसरं काय?"

"तुझा एवढा हट्टच असेल तर देतो बापडा तुला शिंगं." चंद्रदेव मिस्किलपणे म्हणाले, "पण ती माझ्यावरच रोखू नकोस म्हणजे झालं."

"खरंच देणार मला शिंगं तुम्ही?" ससा अधीरपणे म्हणाला.

"देईन रे. पण मग 'माझी शिंगं परत घ्या, म्हणून आलास तर पहा हो आपला विचार!" चंद्रदेवांनी बजावले.

"तसं मुळीच होणार नाही." ससा उतावळीने म्हणाला.

"घे तर शिंगं मग." चंद्रदेव त्याच्या टाळूवरून हात फिरवीत म्हणाले. त्याबरोबर सशाच्या डोक्यावर दोन डौलदार शिंगे उगवली.

आपली ही नवी शिंगे सांबराला कधी दाखवतो असे सशाला झाले. तो चंद्रदेवांच्या मांडीवरून टुणकन उडी मारून पळाला आणि तडक सांबराकडे गेला.

"उगीच तुझ्या शिंगांचा रुबाब करू नकोस." तो दिमाखानं त्याला म्हणाला, "ही पाहिलीस माझी छान छान शिंगं!"

"व्वाः! फारच छान आहेत हं, ससोबा." सांबर मनापासून म्हणाले. माझं त्या दिवशीचं तळ्यावरचं बोलणं तुम्ही मनाला फारच लावून घेतलेलं दिसतं. पण तुम्ही अचानक दचकवल्यामुळं माझ्या तोंडून तिरीमिरीत तसे शब्द गेले हो." त्याने क्षमायाचना केली.

"जाऊ दे झालं." ससा खुशीत म्हणाला. "तू त्या दिवशी बोलला नसतास तर माझ्यातल्या या उणिवेची जाणीव मला कधी झालीच नसती. अजूनही तसाच भुंडा राहिलो असतो मी."

"पळा पळा!" तेवढ्यात सांबर म्हणाले, "वाघ आला."

आणि ते चौखूर उधळले.

ससोबा झटकन एका दगडाआड लपले.


पण सांबर फार पुढे जाऊ शकलेच नाही. त्याची फांद्याफांद्याची शिंगे एका झुडपात अडकली ती काही केल्या सुटेनात आणि तेवढ्यात वाघोबाने त्याला बरोबर गाठलं.

'अरेरे, माझा हा शिंगांचा फापट-पसारा नसता तर मी पळून गेलो

असतो.' सांबराने मरता मरता आक्रोश केला.

तो प्रकार पाहून सशाच्या घशाला कोरड पडली. तो मनात हबकला होता, पण त्याने मनाची समजूत करून घेतली की सांबराची शिंगे भलतीच मोठी असल्याने ही आफत ओढवली. वाघ निघून गेल्यावर तो रुबाबात आपली शिंगे मिरवीत, वाटेत लागणाऱ्या प्रत्येक पाण्याच्या डबक्यात आपले प्रतिबिंब निरखून पाहत, भेटणाऱ्या प्राण्यांना आपली नवी शिंगे दाखवत निघाला.

"ससोबा; पळा, कुत्रे येताहेत." त्याला भेटलेल्या साळिंदराने त्याला इशारा दिला. त्याबरोबर ससा धावत सुटला.



पण शिंगांच्या ओझ्यामुळे आता आपल्याला पहिल्यासारखे धावता येत नाही, आपण दमतो आहोत आणि कुत्रा आपल्याला गाठत येतो आहे ही जाणीव त्याला झाली. तरी पण त्याने कसेबसे बिळाचे तोंड गाठले.

पण शिंगे असल्याने त्याला बिळात जाता येईना.

सांबराची झालेली अवस्था डोळयांपुढे उभी राहून सशाच्या काळजाचे पाणी-पाणी झाले.

"चंद्रदेवा, धावा." त्याने आर्तपणे हाक मारली.

"माझ्याच मूर्खपणानं मी हे संकट माझ्यावर ओढवून घेतलं आहे. मला वाचवा."

चंद्रदेव दिसले नाहीत, पण त्यांचा हात आपल्या टाळू-वरून फिरल्याची जाणीव सशाला झाली आणि दुसऱ्याच क्षणी त्याला हलके हलके वाटले व बिळात जाता आले.

त्या दिवसापासून सशाने पुनः शिंगांचा हट्ट धरला नाही.

* * *

# ५. कासवाची शिष्टाई

एकदा पाण्यात राहणारे मासे आणि जमिनीवर राहणारे पशुपक्षी यांच्यामध्ये 'आपणा दोघांमध्ये श्रेष्ठ कोण' याबद्दल वाद सुरू झाला.

मासे म्हणाले, "तीन चतुर्थांश पृथ्वी पाण्यानं व्यापली आहे. राहिलेली टिचभर चतकोर जमीन आहे. तेव्हा पृथ्वीचे स्वामी आम्हीच आहोत."


पशु-पक्षी म्हणाले, "पशू पाण्यातही विहार करू शकतात. पक्षी तर आभाळातही हिंडतात. तुमच्यापैकी कुणाची लांब उडायची राहिली, पळभर जमिनीवर पाऊल टाकायची तरी हिंमत आहे का?"

निरुत्तर झालेले मासे म्हणाले, "आम्हांला जमिनीवर येता येत नाही काय? मग तुम्ही पाण्यात पाऊल कसं टाकता यापुढं तेच पाहतो आम्ही."

दुसऱ्या दिवशी हत्ती आंघोळीला पाण्यात शिरला तेव्हा माशांनी त्याच्या अंगाला चावे घेऊन 'चींऽचीं' करत त्याला पाण्याबाहेर पळायला लावले. गाई-म्हशी पाण्यावर गेल्या तेव्हा त्यांनी पाण्याला तोंड लावताच मासे त्यांना कडकडून चावले. तशा त्या घाबरून पळाल्या.

पशु-पक्ष्यांनी याचा विचार करण्यासाठी तातडीची सभा बोलावली. माशांना चांगला धडा शिकवायला पाहिजे असे सर्वांचे मत पडले.

चिडलेला हत्ती म्हणाला, "या माशांची एवढी मिजास?



म्हणावं तुम्हांला पाणी येतं ते जमिनीवरनंच ना? उद्यापासून पर्वतावरच्या साऱ्या नद्या अडवून धरा की झक्कत येतील शरण."

'शाब्बास! तसंच करू या.' सारेजण टाळ्या पिटत म्हणाले.

"पण-" कासवाने काहीतरी सांगण्याकरता तोंड उघडले. परंतु सभेने त्याला बोलू दिले नाही.

दुसऱ्या दिवसापासून नद्या-नाले-ओहोळ उगमाजवळ अडवायला आरंभ झाला. प्रथम काही दिवस माशांना काही फरक जाणवला नाही, पण साचलेल्या पाण्याच्या बाष्पीभवनाने आणि नव्या पाण्याचा पुरवठा बंद झाल्याने जलाशय कोरडे पडू लागले, तेव्हा त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. याच्या उलट पशु-पक्ष्यांना पाण्यावर जायची चोरी झाल्याने तेही व्याकुळ झाले आणि अडवलेल्या पाण्याने दुसरे एक संकट उभे केले. नैसर्गिक प्रवाह खुंटल्याने साचलेल्या पाण्याने सारी जमीन जलमय होण्याचा धोका निर्माण झाला.

पण असा सर्वनाश समीप येऊन ठेपला तरी दोघेही हट्टाला पेटले होते.

दोन्हीही पक्ष वेडे आहेत हे कासवाला पटत होते, म्हणून पशुपक्ष्यांच्या सभेत सूड-भावनेला त्याने विरोध करण्याचा प्रयत्न केला, पण त्या वेळी त्याचे कुणी ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. पण आता सर्वनाशाचा धोका आला असताना गप्प बसून भागणार नव्हते.

कासव पाण्यात गेले.

त्याबरोबर मासे हल्ला चढविण्याकरता त्याच्याजवळ आले. ते त्यांना म्हणाले,

"मला कुणी परका मानू नका. माझे हे पाय नसून कल्ले आहेत. त्यांच्या सहाय्यानं मी झपाट्यानं पोहू शकतो पाहा." त्याने त्यांना जलद गतीने पोहून दाखवले. "या पायांनी मला धड चालता येत नाही. जमिनीवर मला सारेजण हळूबाई म्हणून हिणवतात. मी पाण्याखाली कितीही वेळ राहू शकतो. मी पशु-पक्ष्यांपैकी असतो तर हे शक्य झालं असतं का?"

माशांना त्याचे म्हणणे पटले.

अशा रीतीने त्यांचा विश्वास संपादन केल्यावर त्याने त्यांना हळूहळू त्यांच्या लढ्यातील व्यर्थपणा समजावून द्यायला सुरुवात केली.

मासे म्हणाले,

"तुझं म्हणणं आम्हांला पटतं. पण आम्हांला घाबरून पशुपक्षी पाण्यावर येत नाहीत आणि आम्हांला तर पाण्याबाहेर जाणं शक्य नाही. तेव्हा काय करावं?"

"तुमची इच्छा असेल तर मी जाऊन तुमच्या वतीनं बोलणं करीन." कासव म्हणाले.

"चालेल, चालेल! लवकर जा." मासे आनंदात कल्ले आपटत म्हणाले.

कासव पाण्याबाहेर आले.

पाण्यावर पाळत ठेवून असलेले पशु-पक्षी त्याला पाण्यातून बाहेर येताना पाहताच त्याच्या अंगावर धावून गेले.

कासव म्हणाले,

"अरेऽ अरे जरा सबूर! मला ओळखलं नाहीत तुम्ही? मी जलचर नव्हे. मी कासव आहे. तुमच्यासारखाच जमिनीवर चालणारा आणि श्वासोच्छ्वास करणारा."

पशु-पक्षी मागे हटले.

"मग पाण्यात कशाला गेला होतास? माशांनी तुला बरं येऊ दिलं?" हत्तीने संशयाने विचारले, "त्यांनाही आमच्यासारखंच मी तुमच्यातलाच म्हणून सांगितलं असशील."

"हो." कासव शांतपणे म्हणाले, "त्यांना तसं सांगितल्याशिवाय त्यांच्यात प्रवेश मिळाला नसता."

"शाब्बास."पशु-पक्षी म्हणाले, "अशा तऱ्हेनं त्यांच्या पोटात शिरून तू त्यांचा समाचार घेतलास ना?"



"नाही." कासव म्हणाले, "त्यांचा नाश करण्याऐवजी हा सर्वनाश थांबवायचा काही उपाय पाहता आला तर पाहावा म्हणून मी गेलो होतो."

"तुला हा चोंबडेपणा करायला कुणी सांगितलं होतं!" पशु-पक्षी म्हणाले, "माशांनी संपूर्ण शरणागती दिल्याशिवाय हे युद्ध थांबायचं नाही."

"असा वेडेपणा करू नका." कासव म्हणाले, "या हट्टानं शेवटी

सर्वांचाच नाश ओढवेल." त्या सर्वंकष युद्धाने होऊ घातलेल्या सर्वनाशाचे चित्र त्याने त्यांच्यापुढे उभे केले. पशु-पक्षीही खरे म्हणजे या कुजलेल्या युद्धात कंटाळले होते. पण अभिमानामुळे तसे कबूल करायला ते तयार होत नव्हते. ते ओळखून कासव म्हणाले,

"तुम्ही पाण्यातले माशांचे स्वामित्व मान्य करायला कबूल असल्यास ते जमिनीवरचे तुमचे श्रेष्ठत्व मान्य करायला राजी आहेत."

युद्धाआधी हीच स्थिती होती. पण वेड्या माशांना आणि पशु-पक्ष्यांनाही वाटले की हा आपलाच जय आहे. दोघांनीही या अटीवर युद्धबंदीला मान्यता दिली. या यशस्वी मध्यस्थीबद्दल उभय पक्ष्यांनी कासवाची पाठ इतकी थोपटली की ती दगडासारखी कठीण झाली. ती अजून तशीच आहे.

* * *

BVBK-0402812